प्राथमिक शिक्षकांकरिता ( इ. १ ली ते ८ वी)
शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक
अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य
करणेबाबत.
बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा
अधिकार अधिनियम, २००९ प्रमाणे.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय, क्रमांक: आरटीई २०१०/प्र.क्र.५७२/प्राशि-१
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१३.

वाचा :- १) केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९.
२) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली यांची अधिसूचना क्र.फा.सं.६१-१/२०११/ एन.सी.टी.ई. ( एन. एन्ड एस. ), दि.२९ जुले, २०११.
३) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली यांचे इंग्रजी पत्र क्र. ७६-४/२०१०/एनसीटीई /एसीएडी,दि. ११ फेब्रुवारी, २०११ सोबतच्या मार्गदर्शक सूचना.
४) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११.

**प्रस्तावना :-**

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने महाराष्ट्र शासनाने सर्वत्र प्राथमिक व माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत सध्या सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु असून त्यात सुमारे १.८० कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या १ लाख शाळांपैकी सुमारे ३२५७३ शाळा खाजगी आहेत. (अनुदानित २०,४५५, विना अनुदानित १२,०१८)

२. प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शासनाने वेळोवेळी शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता इत्यादीमध्ये सुधारणा केली आहे. सद्यःस्थितीत इयत्ता १ ली ते ७ वी च्या वर्गाला शिकविणा-या सर्व शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता **" इयत्ता १२ वी आणि शिक्षक अध्यापन पदविका ( D.T.Ed ) अशी आहे."** मात्र, उच्च प्राथमिक स्तरावर मान्य होणा-या शिक्षकांपैकी २५ टक्के शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पदवी आणि शिक्षण शास्त्रातील पदविका/पदवी अशी आहे.

३. केंद्र शासनाने भारतीय राज्यघटनेत २००२ साली दुरुस्ती करुन **६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण ( इ. १ ली ते ८ वी )** त्यांचा मूलभूत अधिकार केला आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने **"बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९"** पारित केला असून त्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून राज्यात सुरु झाली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी हा कायदा

वैध ठरविला आहे. या अधिनियमातील तरतूदीची अंमलबजावणी करण्यासाठी राज्याने **"महाराष्ट्र - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११"** नियम अधिसूचीत केले आहेत.

४. **"बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९"** मधील काही ठळक कलमे खालील प्रमाणे आहेत,

(i) **कलम-२ (f)** "Elementary Education means the education from first class to eighth class",

(ii) **कलम-२३** "Any person possessing such minimum qualifications, as laid down by an academic authority, authorized by the Central Government, by notification, shall be eligible for appointment as a teacher."

४.१. **कलम-२ (f)** नुसार इ. १ ली ते ८ वी पर्यंतचे शिक्षण **प्राथमिक शिक्षण** समजले जाणार आहे.

५. केंद्र शासनाने दिनांक ३१ मार्च, २०१० च्या अधिसूचनेद्वारे शिक्षक पदावर नियुक्तीसाठी पात्रता व सेवा शर्ती ठरविण्याकरिता कलम २३ नुसार **"राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE)"** यांना शैक्षणिक प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे.

५.१. **"राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE)"** यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१० व दिनांक २९ जुलै, २०११ च्या अधिसूचनेद्वारे प्राथमिक शिक्षकांकरिता (इ.१ ली ते ८ वी) किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता निश्चित केली असून शिक्षक पात्रता परीक्षा (Teachers Eligibility Test) अनिवार्य केली आहे.

६. कायदयाच्या वरील तरतूदी लक्षात घेता राज्यामध्ये प्राथमिक शिक्षकांसाठी (इ. १ ली ते ८ वी करिता) किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबीचा विचार करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

**"बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** च्या तरतूदी लक्षात घेता, राज्यामध्ये इथून पुढे सर्व प्राथमिक शिक्षकांसाठी (इयत्ता १ ली ते ८ वी करिता) खालीलप्रमाणे किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात येत आहे:-

१.१) <u>इयत्ता पहिली ते पाचवीकरिता</u> :-

अ) **<u>शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता :-</u>**

(i) मान्यता प्राप्त मंडळाची किमान ५० टक्के गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षणशास्त्र दोन वर्षाची पदविका (D.T.ED) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव दिले असो)

**किंवा**

(ii) राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या [National Council for Teacher Education] (Regulations, Norms and Procedure),Regulations, 2002 नुसार , मान्यता प्राप्त मंडळाची किमान ४५ टक्के गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षणशास्त्र दोन वर्षाची पदविका उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव दिले असो).

किंवा

(iii) मान्यता प्राप्त मंडळांची किमान ५० टक्के गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची, चार वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी (Bachelor of Elementary Education) उत्तीर्ण.

किंवा

(iv) मान्यता प्राप्त परिक्षा मंडळाची किमान ५० टक्के गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयात दोन वर्षाची पदविका (विशेष शिक्षण),

किंवा

(v) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि मान्यताप्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र दोन वर्षाची पदविका उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव दिले असो),

किंवा

(vi) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक टिसीएम-२००९/३६/०९/माशि-४, दि. १० जून, २०१० अन्वये उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (MCVC) शाखेअंतर्गत कृषी गटातील Horticulture and Crop Science आणि आरोग्य वैद्यकिय सेवागटातील Crench and Pre School Management परीक्षा उतीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षण शास्त्रात दोन वर्षाची पदविका

ब) <u>शिक्षक पात्रता परीक्षा</u> ( **TET** )

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद, (NCTE) यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासन किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा (Teacher Eligibility Test) उत्तीर्ण.

१.२) <u>इयत्ता ६ वी ते ८ वी करिता :-</u>

<u>अ) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता :-</u>

(i) मान्यताप्राप्त विद्यपीठाची पदवी आणि मान्यताप्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षणशास्त्र दोन वर्षाची पदविका उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव दिले असो)

किंवा

(ii) राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या National Council for Teacher Education] (Regulations, Norms and Procedure),Regulations, 2002 नुसार मान्यताप्राप्त

विद्यापिठाची किमान ४५ टक्के गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षाची पदवी (Bachelor in Education) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव दिले असो)

किंवा

(iii) मान्यता प्राप्त परीक्षा मंडळाची किंमान ५० टकके गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण, आणि चार वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी (Bachelor of Elementary Education) उत्तीर्ण

किंवा

(iv) मान्यताप्राप्त परीक्षा मंडळाची किंमान ५० टक्के गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि चार वर्षाची B.A./B.Sc.Ed. or B.A.Ed./B.Sc.Ed. उत्तीर्ण

किंवा

(v) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किमान ५० टक्के गुणांसह उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची एक वर्षाची B.Ed. (Special Education) पदवी उत्तीर्ण.

किंवा

(vi) कृषी गटातील Horticulture and Crop Science आणि आरोग्य वैद्यकीय सेवा गटातील Crench and Pre School Management मधील पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षणशास्त्रातील एक वर्षाची पदवी .

आणि

ब) <u>शिक्षक पात्रता परीक्षा ( T. E. T. )</u>

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद ( NCTE ) यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासन किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा (Teacher Eligibility Test ) उत्तीर्ण.

२. <u>प्रशिक्षण :-</u>

(i) ज्यांची शैक्षणिक अर्हता किमान ५० टक्के गुणांसह कला, विज्ञान व वाणिज्य शाखेची पदवी आणि B.Ed. अशी असेल किंवा किमान ४५/ गुणांसह कला, विज्ञान व वाणिज्य शाखेची पदवी आणि एक वर्षाची शिक्षणशास्त्रातील ( B.Ed. ) पदवी उत्तीर्ण केली असेल आणि ज्यांची नियुक्ती दि. १ जानेवारी, २०१२ पूर्वी इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत शिक्षक पदावर झाली असेल त्यांना नियुक्तीनंतर राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेद्वारा मान्यताप्राप्त सहा महिन्यांचे प्राथमिक शिक्षणातील विशेष प्रशिक्षण प्राप्त करणे आवश्यक आहे.

(ii) ज्यांच्यांकडे D.Ed. (विशेष शिक्षण) अथवा B.Ed. (विशेष शिक्षण) अर्हता आहे, त्यांनी नियुक्तीनंतर प्राथमिक शिक्षणशास्त्रातील राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेद्वारा मान्यताप्राप्त सहा महिन्यांचे प्राथमिक शिक्षणातील विशेष प्रशिक्षण प्राप्त करणे आवश्यक आहे.

३. <u>पात्रता गुणांच्या टक्केवारीत सूट :-</u> अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती /विमुक्त व भटक्या जमाती/इतर मागासवर्ग/शारिरिक अपंग इ. प्रवर्गाच्या उमेदवारासाठी पात्रता गुणांमध्ये ५ टक्के सूट देण्यात येईल.

४. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE), नवी दिल्ली यांनी वेळोवेळी निश्चित केलेली आणि सुधारित केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या, सर्व माध्यमांच्या, शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित अशा सर्व शाळांमध्ये शिक्षक पदावर नियुक्तीकरिता अनिवार्य राहील.

५. राज्य शासन किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या राज्य शैक्षणिक प्राधिकरण म्हणजे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (MSCERT) पुणे यांना किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतामध्ये आवश्यक ती भर घालता येईल.

६. यापुढे नवीन नियुक्त होणा-या सर्व शिक्षकांसाठी वरीलप्रमाणे किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

७. तसेच सध्या कार्यरत असलेल्या सर्व प्राथमिक शिक्षकांनासुध्दा (इ. १ ली ते ८ वी पर्यंत) अधिनियम २००९ मधील तरतूदीप्रमाणे दिनांक ३१.३.२०१५ पर्यंत वरीलप्रमाणे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता प्राप्त करणे व शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१३२१३१४२००९०७२१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( ना.उ.रौराळे )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुंबई,
३) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
४) मा.मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
५) मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगीसचिव,
६) मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
७) मा.सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य विधान भवन, मुंबई
८) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
९) मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
१०) सर्व प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
११) सर्व महानगरपालिका आयुक्त